# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : desk10@dte.org.in Internet : www.dte.org.in


क्रमांक : १०/एनजीपी/२००९/७५६अ
दिनांक : १०.१०.२००९

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर

**विषय : केंद्र सरकारने नॅशनल बिल्डींग कोड ऑफ इंडिया २००५ कायद्यानुसार आग प्रतिबंधक यंत्रणा सर्व संस्थांमध्ये बंधनकारक करण्याबाबत..**

उपरोक्त विषयाबाबत शासन निर्णय क्र. पीआरई २००९/ प्र.क्र. २९५/ प्राशि १, दि. २७.११.२००९ ’/. कृपया पहावे. त्वरित संदर्भासाठी शासन निर्णयाची प्रत सोबत जोडत आहे.

सदर आदेशाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित पदवी/ पदविका संस्थांच्या प्राचार्यांना संस्थेमध्ये आग प्रतिबंधक यंत्रणा बसविण्याच्या सूचना , आपल्या स्तरावरुन तात्काळ देण्यात याव्यात. तसेच करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आवश्यक कागदपत्रांसह अहवाल या संचालनालयास तात्काळ सादर करण्यात यावा., ही विनंती.

( श्रीमती ए.सी. अत्तार )
प्रशिक्षण व आस्थापना अधिकारी,
तंत्रशिक्षण, म.रा.,मुंबई

*****************************************************************

जा.क्र. तंशि/विकाना/तांशा/316
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक
दिनांक 23 FEB 2010

प्रति,
प्राचार्य,
प्राचार्य, सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित,
अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / वास्तुशास्त्र /एचएमसीटी अभ्यासक्रम,
पदवी व पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था
नाशिक विभाग

२/- त्यांना कळविण्यात येते की, संचालनालयाचे सदर पत्रातील सूचनेप्रमाणे व त्यासोबतचे महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या दिनांक २७.११.२००९ च्या शासन निर्णयामधील निर्देशानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. व केंद्र सरकारने नॅशनल बिल्डींग कोड ऑफ इंडिया २००५ कायद्यानुसार आग प्रतिबंधक यंत्रणा आपल्या संस्थेत तात्काळ प्रस्थापित करावी. व तसा अहवाल **तात्काळ** या कार्यालयास सादर करावा.

(डॉ.आर.एस.नायडू)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक

प्रत - प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नाशिक
२/- सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

राज्यातील जिल्हा परिषदांच्या प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा/ महाविद्यालयात अग्निशमन सुरक्षेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
शासन निर्णय,क्रमांक-पीआरई-२००९/प्र.क्र.२९५/प्राशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २७ नोव्हेंबर,२००९.

**पहा:-** १) शासन निर्णय,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,क्र.पीआरई-२००८/(१२१/०८)/प्राशि-१ दि.२८-३-२००८

२) शासन निर्णय,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,क्र.पीआरई-२००८/(१२१/०८)/प्राशि-१ दि.१८-६-२००८

३) नगर विकास विभागाचे अंशस-१४०९/१४२७/प्रक्र.१७२/नवि-२० दि.२४-९-२००९.

**प्रस्तावना:-** मा.सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्रमांक ४८३/२००४ मध्ये दि. १३-४-२००९ रोजी शाळामध्ये अंमलबजावणी करावयाच्या सुरक्षितते संदर्भात पुढील आदेश दिले आहेत. - नवीन शाळा सुरु करण्यापूर्वी सदर शाळेची इमारत नॅशनल बिल्डींग कोड प्रमाणे असल्याची तसेच शाळेची इमारत सर्व बाजूंचा विचार करता सुरक्षित असल्याची खात्री करावी. सर्व कार्यान्वीत शाळांमध्ये अग्निशामक यंत्रे बसविण्यात यावीत शाळेच्या इमारतीमध्ये ज्वालाग्राही /घातक वस्तू ठवण्यास प्रतिबंध करण्यात यावा. प्रत्येक शाळेची नॅशनल बिल्डींग कोड मधील तत्वे विचारात घेऊन नियमित तपासणी करावी. प्रत्येक शाळेचे सुरक्षा प्रमाणपत्र तपासणी करुन देण्यात यावे आणि असे काम न करणा-या अधिका-यांवर कडक कारवाई करण्यात यावी. अग्निशामक यंत्राचा वापर करण्याबाबत शालेय कर्मचा-यांना प्रशिक्षण देण्यात यावे. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले वरील आदेश विचारात घेऊन नवीन शाळा सुरु करण्याबाबत तसेच सध्याच्या शाळेतही आवश्यक तेथे अग्निशामक यंत्रे व प्रथमोपचार पेटी ठेवणे आवश्यक करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**मा.सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्रमांक ४८३/२००४ मध्ये दि. १३-४-२००९ रोजी शाळामध्ये अंमलबजावणी करावयाच्या सुरक्षितते संदर्भात दिलेल्या आदेशाची प्रत यासोबत जोडपत्र -अ मध्ये आहे. राज्यातील जिल्हापरिषदा/ महानगरपालिका/नगर पालिका /नगरपरिषदा येथील शाळा तपासणीसाठी संबंधीत शिक्षणाधिकारी यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी-

अ) नवीन प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक शाळांच्या बांधकाम करतांना नॅशनल बिल्डिंग कोडप्रमाणे बांधकाम करण्यात यावे. त्या-त्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंत्यांकडून /किंवा जिल्हापरिषद सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंत्योगडून सदर शाळेची इमारत नॅशनल बिडींग कोड ऑफ इंडिया, २००५ प्रमाणे असल्याचे प्रमाणपत्र घेण्यात यावे.